**<u>नियमित दिवाणी कज्जा क्र.०९/२०१२ मधील नि.क्र.९० वरील आदेश</u>**

( पारीत दिनांक – ०१/०९/२०२२)

सौ. शकिला रमजना तब्बलजी वि. राजेंद्र भिमराव जाधव.

**CNR -MHKO130000502012**

**१.** प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ४ यांनी त्यांच्याविरुध्द झालेला दिनांक १०/०१/२०१९ रोजीचा व दि. १३/०१/२०२२ रोजीचा 'उलटतपास नाही' असा आदेश रद्द करुन मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

**२.** प्रतिवादी क्र. ४ च्या कथनानुसार, प्रस्तुत दाव्याची चौकशी सुरु असून वादी व वादीतर्फे साक्षीदार मोजणी अधिकारी महेश कुंभार यांचे सरतपासाचे ॲफिडेव्हीट व सरतपास दाखल झाला आहे. सदरचे ॲफिडेव्हीट व सरतपास दाखल झालेनंतर कोरोना कालावधीमुळे उलटतपास होवू शकला नाही, त्यानंतर, प्रस्तुतचे काम वादी यांचा उलटतपास घेणेवर नेमले होते व त्याप्रमाणे उलटतपास घेणेचा होता परंतु, वादी व प्रस्तुत प्रतिवादीमध्ये आपसातीची बोलणी सुरु होती. प्रस्तुत वादी व प्रतिवादीनी दावा मिळकतींची मोजमापांची प्रत्यक्ष पाहणीही केली. प्रतिवादी हे आता अपासात तडजोड होणार या समजुतीने त्यांना व वकीलांना भेटून उलटतपासाकरीता आवश्यक ती माहिती देता आली नाही. तसेच, वादीतर्फे साक्षीदार क्र. २ महेश कुंभार यांचे जबाबा वेळी पुन्हा कोरोनाचे निर्बंध सुरु झालेने सदर साक्षीदाराचा उलटतपास घेता आला नाही. प्रतिवादींना कोरोनाचे प्रादुर्भावामुळे पुन्हा कोर्टकामकाज सुरु झालेची माहिती मिळाली नाही. त्यामुळे, प्रतिवादी क्र. ४ विरुध्द 'उलटतपास नाही' असा आदेश पारित करणेत आला आहे. सबब, वरील कारणास्तव, त्यांच्याविरुध्द झालेला 'उलटतपास नाही' असा आदेश रद्द करण्याकरीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

**३.** सदर अर्जावरती वादीने अर्जाच्या मागील बाजूस त्यांचे म्हणणे दाखल केले असून त्यांनी अर्जातील संपूर्ण कथने नाकारलेली आहेत. याकामी निशाणी क्र. ५९ वर वादीचा सरतपास दि. २४/१०/२०१६ रोजी दाखल केला होता. त्यानंतर, मे.कोर्टानी दि. ०७/०७/२०१७ रोजी वादीचे कागदपत्रांना निशाणी देवून काम वादीचे उलटतपासाकरीता नेमले होते. त्यानंतर, दि. १०/०१/२०१९ रोजी वादीचा उलटतपास नाही असा आदेश झाला आहे. म्हणजेच, सदर आदेश कोरोना महामारीपूर्वी झाला आहे. त्यामुळे, अर्जातील सर्व कारणे खोटी नमुद केलेली आहेत. त्यानंतर, वादीतर्फे साक्षीदार क्र. २ यांची साक्ष दि. १३/१२/२०२१ रोजी झालेली आहे. त्यानंतर, उलटतपासाकरीता दि. १३/०१/२०२२ ही तारीख नेकमली होती. त्यादिवशी प्रतिवादींनी उलटतपास घेतला नाही म्हणून सदर साक्षीदाराचा

देखील उलटतपास नाही असा आदेश झाला आहे. त्यानंतर, वादीतर्फे साक्षीदार क्र. ३ यांची साक्ष नि. ८८ दि. २३/०३/२०२२ रोजी नोंदविलेली आहे. त्यांचा देखील प्रतिवादींनी उलटतपास न घेतल्याने उलटतपास नाही असा आदेश झालेला आहे. दि. २३/०३/२०२२ रोजी वादींनी पुरावा बंद केला व दि. ०१/०४/२०२२ रोजी प्रस्तुतचे काम प्रतिवादींचे पुराव्यावर ठेवलेचे रोजनाम्यावरुन दिसून येते. अशाप्रकारे, प्रतिवादींनी दि. १०/०१/२०१९ पासून पहिल्यांदा उलटतपास नाही असा हुकूम झालेनंतर दि. २३/०३/२०२२ रोजी प्रस्तुचा अर्ज दिला आहे. यावरुन प्रतिवादींचा निष्ठाळजीपण दिसून येतो. त्यामुळे, सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा तसेच मंजूर केला तर, प्रतिवादी यांना रक्कम रु. १०,०००/– इतका दंड करण्यात यावा अशी वादीची विनंती आहे.

**४.** उभय बाजूंच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

**५.** अभिलेखाचे अवलोकन करता, प्रस्तुत प्रतिवादी क्र. ४ यांच्याविरुध्द दि. १०/०१/२०१९ व दि. १३/०१/२०२२ रोजी 'उलटतपास नाही' असा आदेश पारित करण्यात आला आहे असे दिसून येते. तद्नंतर, दि. २३/०३/२०२२ रोजी वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. प्रतिवादीच्या अर्जातील कथने शपथेवरती आहेत. त्यामुळे, ती ग्राहय धरावी लागतील. नैसर्गिक न्याय तत्त्वाचा विचार करता, वादीचा व वादीतर्फे साक्षीदारांचा उलटतपास घेण्याची संधी प्रतिवादीस देणे योग्य राहील, तसे न झाल्यास नैसर्गिक न्याय तत्त्वाचे उल्लंघन होईल असे वाटते. निश्चितपणे, प्रस्तुत कामी सन २०१९ साली झालेला 'उलटतपास नाही' हा आदेश प्रतिवादी क्र. ४ हे रद्द करुन मागत आहेत. सदरच्या अर्जामुळे व प्रतिवादीच्या कृत्यामुळे दाव्याच्या कामी जो विलंब झाला, त्याकरीता काही रक्कम खर्च स्वरुपात प्रतिवादीवरती बसविणे योग्य राहील. सबब, वरील सर्व कारणास्तव खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो–

**– आ दे श –**

१) अर्ज (निशाणी क्र. ९०) प्रतिवादीने वादी यांना आज तारखेपासून ७ दिवसांच्या आत रक्कम रुपये ६००/– ही खर्च स्वरुपात देण्याच्या अटीवर वादी स्वतः व वादीतर्फे साक्षीदार महेश कुंभार यांचेकरीता प्रतिवादी क्र. ४ विरुध्द झालेला 'उलटतपास नाही' असा आदेश रद्द करण्यात येतो.

Amol Bharat Jawale
Digitally signed by Amol Bharat Jawale
Date: 2022.09.01 17:55:38 +0530

कागल.
दिनांक – ०१/०९/२०२२

**(अमोल भारत जवळे)**
सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.